

प्रयोग ग्रामीण पुनर्रचनेचा

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालय

अंबाजोगाई, जि. बीड

पर्व २ रे

# डॉ. द्वारकादासजी लोहिया (बाबुजी) स्मृती व्याख्यानमाला

मानवलोक ग्रामीण विकासाच्या उपक्रमात १९८२ पासून पाणलोट, शेती, आरोग्य, शिक्षण, वृध्द, महिला इ. घटकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. संस्थेचे संस्थापक सचिव **डॉ.द्वारकादासजी लोहिया (बाबुजी)** यांच्या स्मृती प्रित्यर्थ दि.०७.०९.२०२१ (जयंती) ते २३.११.२०२१ (पुण्यतिथी) या कालावधीत विविध सामाजिक प्रश्नावर सुरु असलेल्या अनेक नव्या प्रयोगांची माहिती देण्याकरिता व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे.

व्यक्ती, समाज आणि शासन या तिन्ही घटकाच्या कृतीशिल सहभागाने विकासाची प्रक्रिया प्रभावीपणे राबवता येते. व्यक्ती विकासासाठी शासनाद्वारे अनेक योजना निर्माण केल्या जातात, परंतु त्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत समाजकार्याच्या भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची आवश्यकता असते.जबाबदारी जर कर्तव्य भावनेतून व समाजनिष्ठेतून पार पाडल्यास प्रश्नांची उकल सहज शक्य आहे. हे दाखवून देणारे अनेक प्रयोग/उपक्रम आपल्या अवती भवती सुरु असतात. त्यापैकी एक म्हणजे श्रीमती मनिषाताई कदम, अंगणवाडी पर्यवेक्षक म्हणून काम करतांना त्यांनी लोकसहभागातून **व्यक्ती विकासाची लोकचळवळ** निर्माण केली आहे. या विषयावर संवाद साधण्यासाठी मानवलोक परिवाराचे मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाईच्या वतीने विशेष वेबीनारचे आयोजन केले आहे, कृपया सर्वांनी सहभागी व्हावे ही नम्र विनंती.



-: प्रमुख मार्गदर्शक :-

**मा.श्रीमती मनिषाताई कदम**

अंगणवाडी पर्यवेक्षक, औरंगाबाद

## विषय : व्यक्ती विकासासाठी लोकचळवळ

**दिनांक :** १४ सप्टेंबर २०२१
मंगळवार
**वेळ :** सकाळी ११.०० वा.

**थेट प्रसारण स्थळ :**
facebook LIVE
**Manavlok Ambajogai**
https://www.facebook.com/manavlokambajogai/live

-: विनित :-

| प्रा. किसन शिनगारे | डॉ. प्रकाश जाधव | श्री.अनिकेत लोहिया |
|---|---|---|
| समन्वयक, वेबीनार<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई | प्राचार्य<br>मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई | कार्यवाह<br>मानवलोक, अंबाजोगाई |

RAPande

**Coordinator IQAC**
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

**Principal**
Manavlok's Collage Of Social Sciences
Ambajogai Dist. Beed

# Webinar No- 02

| Title | People's Movement for Individual Development |
|---|---|
| Resource Person | Mrs.Manishatai Kadam<br>Anganwadi Supervisor, Aurangabad |
| Date | 14/09/2021 |
| Coordinator | Dr. Kisan Shingare |

Manavok's College of Social Work Ambajogai is well known education institute. Along with curricular activities many other programmes are conducted for the overall development of students. Since 1982, Manavlok has been consistently active in the development of watershed, agriculture, health, education, elderly, month etc. elements of rural development. The organization established by founder secretary Dr. Dwarkadasji Lohia (Babuji). A series of lectures has been organized to commemorate Dr. D.S. Lohiya(Babuji) during the period from 27th September (Jayanti) to 23rd November 2021 (Punyathithi).

The administrative system needs activists who work with the spirit of social work. Similarly, Manishatai Kadam, is working as an anganwadi supervisor in Aurangabad. She has been honored with many awards for her remarkable work, which mainly include the following awards: Adarsh Karma Award by Yashwant Panchayat Gram Abhiyaan from Hon'ble Governor, Yashasva Mahila Officer Award from Hon'ble Chief Minister, Savitribai Phule Award, etc. This webinar was organized to share the experience of Manishatai Kadam with the audience and to inspire the social work students.

Availability of space is the main issue for Anganwadi.Samaj Mandir, Chavadi, School room or Anganwadi sevaki and helpers house is the last option to open Anganwadi. Manishatai took initiative and she organised the helpers of the village, Sarpanch, Gram Sevak members, Mahila Mandal, Bhajan Mandal, Tarun Mandal, the teachers of the school, the parents and called their meetings number of times according to their convenience and told them to understand that the Anganwadi in the village is our model of governance. Meetings were held several times to convince them that engineers, doctors, teachers, policemen would become village servants.

It was difficult to bring them together as the village had a small population but more political parties. But on the issue that we want to do something for our children. Manishatai Kadam workd hard to mke an excellent model of Anganwadi, as a supervisor she pramoted this movement in overall Maharashtra state. Due to her initiative Anganwadi got an ISO certification.

R.A. Rande
Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई, बीड.
## डॉ. द्वारकादासजी लोहिया ( बाबुजी) स्मृती व्याख्यानमाला २०२१.

14/09/2021.

**साधन व्यक्ती : मनीषाताई कदम, अंगणवाडी पर्यवेक्षिका, औरंगाबाद.**
**विषय : "व्यक्ती विकासासाठी लोकचळवळ"**

मानवलोक ग्रामीण विकासाच्या १९८२ पासून पाणलोट, शेती, आरोग्य, शिक्षण, वृद्ध, महिला इत्यादी घटकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. संस्थेचे संस्थापक सचिव डॉ द्वारकादासजी लोहिया ( बाबुजी) यांच्या स्मृती प्रित्यर्थ दि. ०७ सप्टेंबर(जयंती) ते २३ नोव्हेंबर २०२१(पुण्यतिथी) या कालावधीत विविध सामाजिक प्रश्नावर सुरु असलेल्या अनेक नव्या प्रयोगांची माहिती देण्याकरिता व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे.व्यक्ती, समाज आणि शासन या तिन्ही घटकांच्या कृतिशील सहभागाने विकासाची प्रक्रिया प्रभावीपणे राबवता येते. व्यक्ती विकासासाठी शासनाद्वारे अनेक योजना निर्माण केल्या जातात, परंतु त्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत समाजकार्याच्या भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची आवश्यकता असते. असेच समाज बदलाचे प्रयोग करणाऱ्या मनीषाताई कदम ह्या औरंगाबाद येथे अंगणवाडी पर्यवेक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी जगातील पहिली अंगणवाडी आय. एस. ओ. करण्याचा बहुमान मिळवला आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.त्यामध्ये प्रामुख्याने पुढील पुरस्कारांचा समावेश आहे. मा . राज्यपालांच्या हस्ते यशवंत पंचायत ग्राम अभियान तर्फे आदर्श कर्मचारी पुरस्कार , जागतिक महिला दिन निमित्त मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते यशस्वी महिला अधिकारी पुरस्कार, सक्षमता पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार इत्यादी. त्यांचे अनुभव श्रोत्यांना कळावेत व समाज कार्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने या वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते.



<u>परिचय</u>

**संपूर्ण नाव** - सौ.मनीषा साहेबराव कदम
**शिक्षण** - MSW
**सध्या कार्यरत** - <u>अंगणवाडी पर्यवेक्षिका</u>
**"एकात्मिक बालविकास सेवा योजना",**
**दौलताबाग विभाग , ता .जि.औरंगाबाद**



R.A.Pande
**Coordinator IQAC**
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

◆ <u>केलेले कार्य</u> ◆

लोकनिधी जमा करून ४३ अंगणवाडी केंद्र डिजिटल बनविले . संपूर्ण जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेरील अंगणवाडी क्षेत्रात डिजिटल संकल्पना राबविली . २ ऑक्टोबर २०१२ रोजी देशातील पहिल्या तीन अंगणवाडी केंद्रांना ISO मानांकन मिळवून घेतले . आजपर्यंत ३० अंगणवाडी केंद्रांना ISO प्राप्त झाले व ४३ अंगणवाडी केंद्र डिजिटल झाले. स्वच्छ व सुंदर अंगणवाडी केंद्रामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी झाले .अंगणवाडीत मुलांची उपस्थिती वाढली . किशोरी ,गरोदर माता यांच्या माता बैठका जास्तीत जास्त घेऊन मार्गदर्शनामुळे येणारे बाळ हे सुद्धा सुद्रढ जन्माला येऊ लागली . गावातील मुलांना ३० ते ४० हजर रु देऊन खाजगी बालवाडीत पाठविण्याची गरज नाही अंगणवाडी केंद्र फक्त भात वाटप केंद्र न राहता जागतिक दर्जा प्राप्त झाला

**• कार्याची घेतलेली दखल •**

(१) या अंगणवाडी केंद्रात मा.सुधीर मुंगटीवार साहेब (वित्त मंत्री)

(२) मा. पंकाजाताई मुंडे (महिला व बालविकास मंत्री)

(३) मा. बबनराव लोणोकर (स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री)

(४) मा. डॉ कोडेला शिवप्रसादराव (आंध्रप्रदेश विधानसभा,अध्यक्ष)

(५) मा. टेडछाइवान (युनिसेफ सदस्य )

(६) मा.विद्या ठाकूर (महिला व बालविकास राज्यमंत्री )

(७) मा. सुनील गायकवाड साहेब (खासदार)

(८) मा.राजेशकुमार साहेब *(प्रधानसचीव व स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री)*

(९) मा. वर्षाताई गायकवाड *(तत्कालीन महिला व बालविकास मंत्री)*

(१०) मा फोजीया खान *(तत्कालीन आरोग्य मंत्री)*

(११) मा.बांटीया सर *(तत्कालीन मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य)*

मा.संजीवकुमार *(तत्कालीन मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य)*

**<u>आय.एस.ओ. अंगणवाडीकडे यशस्वी वाटचाल:-</u>**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना हि केंद्र सरकारची देशातील सर्वात मोठी यंत्रणा आहे. या यंत्रणेमार्फत किशोरवयीन मुली, गरोदर माता, स्तनदा माता, शून्य ते ६ वर्ष वयोगटातील मुले यांना सेवा दिली जाते .हि सेवा ग्रामीण, शहरी, आदिवासी भागात






Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

अंगणवाडीच्या माध्यमातून दिली जाते .

या अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस या मानधन सेवेवर कामकाज पाहत असतात . अंगणवाडीचे स्वरूप पाहता अंगणवाडी म्हणजे फक्त भात वाटप केंद्र असे म्हंटले जायचे.

अंगणवाडी साठी जागा उपलब्ध नसे,समाज मंदिर,चावडी, शाळेची खोली, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या घरी किंवा भाडे स्वरुपाची खोली व शेवटचा पर्याय म्हणजे अंगणवाडी उघड्यावर भरविली जात.समाजमंदिरात काही माणसे जुगारही खेळत असे . अंगणवाडीत तेथेच चूल ,सर्प , दोन चार मुले हातात पातेले घेऊन खिचडीची वाट पाहत बसलेले असत , भिंतीला रंग नाही , दारे ,खिडक्या मोडक्या आणि अस्वच्छतेमुळे माशांचे प्रमाण जास्त. अशा या वातावरणात आपल्या देश्यातील भावी पिढी तयार होत असे . सहा वर्ष वयोगटापर्यंत बालकाचा बौद्धिक , मानसिक ,सामाजिक व शारीरिक विकास होतो असे म्हंटले जायचे . आई नंतर अंगणवाडी , परंतु या अंगणवाडीकडे सर्वांचेच दुर्लक्ष . अंगणवाडीतील कार्यकर्ती व मदतनीस सोडली तर इतर कोणीही अंगणवाडीकडे फिरकत नसे . फक्त भात नेण्यासाठी गरजू मुले व माता येथे येत असत .अंगणवाडीला शासनाकडून एका वर्षासाठी एक हजार रुपये मिळत . या एक हजार रुपयांत अंगणवाडी कार्यकर्ती आवश्यक त्या वस्तू खरेदी करत असे . हा निधी अपुरा आहे परंतु प्राप्त परिस्थितीत सर्वजण आनंदाने कामे करत होती . या अंगणवाडीतील कार्यकर्ती ,मदतनीस ,गावातील सरपंच ,ग्रामसेवक ,सदस्य ,महिलामंडळ ,भजनीमंडळ ,तरुणमंडळ ,शाळेतील शिक्षक ,पालकवर्ग या सर्वांना त्यांच्या सोयीनुसार वेगवेगळया वेळेत त्यांना बोलावून गावातील अंगणवाडी हि शासनाची नसून आपली आहे या अंगणवाडी आपल्या गावातील मुले येतात व मुलांचा विकास याच वयात होतो हे त्यांना समजून सांगितले जर यांना चांगले शिक्षण मिळाले तर इंजिनिअर ,डॉक्टर ,शिक्षक ,पोलिस ,ग्रामसेवक बनतील हे त्यांना पटवून दिले . यासाठी अनेकवेळा त्यांच्या बैठका घेण्यात आल्या.



गावात लोकसंख्या कमी परंतु राजकीय पक्ष जास्त असल्यामुळे त्यांना एकत्रित आणणे कठीण गेले . परंतु आपल्या मुलांसाठी काहीतरी करायचे आहे या मुद्द्यावर आप-आपसातील वाद विसरून सर्व एकत्र आले सर्वात प्रथम ग्रुप बनवून गावातील हॉटेल ,कंपन्या ,शाळा ,पोलिस स्टेशन तसेच पालकांकडून लोकनिधी घेण्यास सुरुवात केली .गावातील जेष्ठ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली हि मोहीम राबविली गेली. यात एक


Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

रुपया पासून ,अन्न-धान्य व वस्तूच्या स्वरुपात लोकनिधीला सुरुवात झाली . या पैशातून अंगणवाडीला डागदुगी,रंगकाम ,डिजिटल बोर्ड ( प्राणी ,पक्षी,फुले,राष्ट्रीय नेते ,रंग ओळख ,अंगणवाडीच्या सेवा –उद्दिष्टे ,सुविचार ,फळे ,भाज्या इ. ) यांची माहिती डिजिटल स्वरुपात अंगणवाडीत लावण्यात आली . तसेच अंगणवाडीत कारपेट ,मुलांना गणवेश,ओळखपत्र ,बूट-पायमोजे, फर्निचर ,पिण्याच्या पाण्याचा स्वतंत्र नळ ,विजेची व्यवस्था ,पंखा ,दूरदर्शन संच ,अंगणवाडीच्या बाहेर कार्टून अंगणवाडीच्या समोर बगीच्या व झोका ,सी–स्वा, घसर-गुंडी, बसविण्यात आली .

एका अंगणवाडीला कमीत-कमी ३० हजार ते ३५ हजार रुपये व जास्तीत जास्त ७० हजार पर्यंत खर्च आला अश्या प्रकारे ६ महिन्यात माझ्या विभागातील ४३ अंगणवाड्यांचे स्वरूप बदलून एक नवीन आदर्श घडवून आणला.

## २ ऑक्टोबर २०११ रोजी अब्दीमंडी या गावातील तीन अंगणवाडी केंद्रांना आय.एस.ओ. ९००१ -२००८ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मानांकन मिळवून देऊन एक नवीन इतिहास रचला .



आयएसओ आंगणवाडी अब्दीमंडी

या आय.एस.ओ. केंद्राची प्रेरणा घेऊन माझा पूर्ण विभाग म्हणजेच ३० अंगणवाड्यांना आज आय.एस.ओ. मानांकन मिळाले आहेतसेच माझ्या जिल्ह्यातील व इतर सर्व जिल्ह्यातील तसेच राज्याच्या बाहेरील लोकांनी भेटी देऊन त्यांनी आय.एस.ओ. अंगणवाड्यांची प्रेरणा घेऊन त्यांच्या जिल्ह्यात ,राज्यात काम सुरु केले .

या आय.एस.ओ. मानांकनात फक्त अंगणवाड्यांची रंग-रंगोटी न पाहता यात आपण आपल्या लाभार्थ्यांना ज्या सेवा दिल्या आहेत या संपूर्ण गोष्टी पहिल्या जातात .

१) ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांची पूर्व प्राथमिक शिक्षणाची उपस्थिती वाढली .

R.A. Pande
Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517



Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

२) भ्रुणहत्या रोखावी यासाठी जनजागंती मुलींच्या नावे झाडे लावणे व जगविणे , अर्धवार्षिक वाढदिवस , गावातील दुकानात चिप्स ,कुरकुरे ,म्यागी ,भिस्कीट ,च्योकलेट न ठेवता फळे ,गुळ ,शेंगदाणे ,राजगिरी लाडू ,पेंड खजूर ठेवण्याबाबत दुकानदारास आवाहन करण्यात आले .अश्या या अंगणवाड्यांना जिल्ह्यातील वजिल्ह्याबाहेरील अंगणवाडी कार्यकर्ती ,मदतनीस ,पर्यवेक्षिका यांनी भेटी दिल्या तसेच देशातील व देश्या बाहेरील मान्यवरांनी या लोकनिधीच्या स्वरूपातून केलेल्या कामाची प्रशंसा केली .भारतीय भाषांमध्ये अंगणवाडी शब्दाचा अर्थ "अंगणामधील निवारा" असा आहे. अंगणवाड्या भारत सरकारने १९७५ साली एकात्मिक बाल विकास सेवा अंतर्गत चालू केल्या आणि त्याचा उद्देश बालकांमधील कुपोषणाशी लढणे हा होता. महाराष्ट्र राज्यात १०८००५ अंगणवाड्या/ मिनी अंगणवाडी केंद्रे आहेत. राज्यात ५५० पेक्षा जास्त एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प चालू आहेत, ज्यामध्ये ४००० वर पर्यवेक्षक आणि अंदाजे २ लक्ष अंगणवाडी कर्मचारी/ मदतनीस आणि छोट्या अंगणवाडीमधील कर्मचारी कार्यरत आहेत आणि ते संपुर्ण आईसीडीएस प्रकल्प निम्नस्तरापासून चालवत आहेत.आईसीडीएसअंतर्गत अंगणवाडी हे सर्व आरोग्य, पोषण आणि शिक्षण विषयक योजनांचे मध्यवर्ती केंद्र आहे.



मुलांना शिकवतांनाआंगणवाडी कार्यकर्ती

| अ.क्र. | लाभार्थी | उपलब्ध सेवा |
|---|---|---|
| १ | गरोदर आणि उपचार चालू असलेल्या माता, किशोरवयीन ११ ते १८ वयोगटातील मुली. | i. आरोग्य तपासणी<br>ii. गरोदरमहिलांचे धनुर्वातविरोधी लसीकरण<br>iii. संदर्भ सेवा<br>iv. पुरक पोषण आहार<br>v. पोषण आणि आरोग्य शिक्षण |
| २ | अन्य महिला वयोगट १५ ते ४५ वर्षे | i. पोषण आणि आरोग्य शिक्षण |
| ३ | १ वर्ष वयाखालील बालके | i. पुरक पोषण आहार<br>ii. लसीकरण<br>iii. आरोग्य तपासणी<br>iv. संदर्भ सेवा |

R A Panale
Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517

| | | |
|---|---|---|
| ४ | १ ते ३ वयोगटातील बालके | i. पुरक पोषण आहार<br>ii. लसीकरण<br>iii. आरोग्य तपासणी<br>iv. संदर्भ सेवा |
| ५ | ३ ते ६ वयोगटातील बालके | i. पुरक पोषण आहार<br>ii. लसीकरण<br>iii. आरोग्य तपासणी<br>iv. संदर्भ सेवा<br>v. अनौपचारिक पूर्वशालेय शिक्षण |

अशा प्रकारे सखोल अशी माहिती मनीषाताई कदम यांनी दिली.लोकसहभागातून बदल घडवता येतो व शासकीय योजना यशस्वी करता येतात हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. या कार्यक्रमात ३० हुन अधिक व्यक्ती प्रत्यक्ष सहभागी झाले होते. तर ७०० हुन अधिक लोकांना या ऑनलाईन कार्यक्रमाद्वारे महत्वपूर्ण अशी माहिती मिळाली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. हनुमंत साळुंके यांनी केले. यासाठी श्री. अनिकेत लोहिया, कार्यवाह मानवलोक आणि प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.

आंगणवाडीत खाजगी डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी






आहार प्रदर्शन

Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517



Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517



आंगणवाडीत मातांना मुलांच्या वजना संदर्भात माहिती देतांना

किशोरवयीन मुलींना माहिती देतांना
वैद्यकिय अधिकारी



R. A. Pande
Coordinator IQAC
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed -431517

Principal
Manavlok's College of Social Work
Ambajogai Dist. Beed 431517